# साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हलचे आयोजन

**प्रतिनिधी, पुणे**

**क्विक हिलतर्फे** महाराष्ट्र सायबर आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहकार्याने शनिवारी (१६ नोव्हेंबर) साय-फाय आर्ट?स फेस्टिव्हल २०१९ आयोजित करण्यात आला आहे. लघुपट, भित्तिपत्रके, कथाकथन, निबंध असे विविध कलाप्रकार महोत्सवात सादर केले जातील.

विश्वकर्मा विद्यापीठाच्या आवारात रंगणाऱ्या या महोत्सवाला ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक प्रा. समर नखाते यांच्यासह चित्रपट, रंगभूमी आणि दूरचित्रवाणी क्षेत्रातील आघाडीचे कलाकार उपस्थित राहणार आहेत. यात सहभागी होणाऱ्या देशभरातील स्पर्धकांचे परीक्षकांसह समाजमाध्यमांतूनही स्पर्धकांचे परीक्षण करण्यात येईल.

व्यक्ती, उद्योग आणि सरकारी आस्थापनांच्या कार्यप्रणालीत डिजिटल तंत्रज्ञानाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

सायबर धोके वाढत असताना सायफाय आर्ट्स फेस्टिव्हलद्वारे सायबर सुरक्षा जागृतीवर भर देण्याचे उद्दिष्ट आहे, असे क्विल हिल टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी सांगितले.